# - प्रेस नोट -

दि. १७/०७/२०२६

## पवई पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १५/०७/२०२६ रोजी १२:३० वा. च्या सुमारास फिर्यादी महिला वय-४० वर्षे, धंदा-सेक्युरिटी गार्ड, रा.ठी- पवई, मुंबई हे त्यांच्या राहत्या घरी पठाणवाडी, हनुमान मंदीराच्या बाजुला फिल्टरपाडा,पवई, मुंबई येथे असताना फिर्यादींचा मुलगा अटक आरोपी पुरुष वय -३० वर्षे,याला पोलीसांनी तडीपार केलेले असताना देखील घरी येवुन फिर्यादीला दारू पिण्यासाठी पैसे मागीतले असता फिर्यादी यांनी त्यास नकार दिल्याने त्याचा राग मनात धरून त्याने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या हातातील धारदार चाकुने फिर्यादीच्या गळयावर वार करणार इतक्यात फिर्यादी यांनी तो वार उजव्या हातावर घेतल्याने हातास कापुन दुखापत झाली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१६/०७/२०२६ रोजी गु.र.क्र. ७५६/२६, कलम १०९,११५ (२), १२७ (२), ३५१ (३), बीएनएस २०२३ सह कलम ३७ (१),(अ), १३५, १४२ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------

Scanned with CamScanner